3/6/26, 11:04 AM WhatsApp Image 2025-12-15 at 3.22.54 PM.jpeg (606×1280)

३ नगरसेवा टाइम्स गुरुवार दि. १० जुलै २०२५

# रखडलेले भूसंपादन, वाहतूक कोंडीसाठी महाप

**पुणे : प्रतिनिधी**

भूसंपादनाअभावी शहरातील अनेक रस्त्यांचे रुंदीकरण रखडल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी; तसेच 'मिसिंग लिंक' जोडण्यासाठी कृती दल (टास्क फोर्स) स्थापना करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतला आहे. या कृती दलामध्ये महसूल, महापालिका आणि राज्य सरकारच्या नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे.

शहराचे दक्षिणेचे प्रवेशद्वार असलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्याचे रखडलेले रुंदीकरण, कोथरूड विधानसभा मतदारसंघातील अर्धवट असलेली 'मिसिंग लिंक'ची कामे भूसंपादनाअभावी रखडली आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत सक्तीच्या भूसंपादनाच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर, भूसंपादन विभागाच्या उपायुक्त शकुंतला बारवे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

'महापालिका सक्तीच्या भूसंपादनासाठी प्रस्ताव पाठविते. मात्र, महसूल विभागांसह नगररचना विभागातील अधिकारी यांच्यामध्ये समन्वय नसल्याने वर्षानुवर्षे प्रस्ताव रखडले जातात. त्यामुळे जागेच्या किमतीही वाढतात. हे प्रस्ताव तातडीने आणि प्राधान्याने मार्गी लागावेत, यासाठी महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय; तसेच नगररचना विभागातील



अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या कृती दलाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला,' अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. या कृती दलाच्या माध्यमातून प्रत्येक

# खराडी येथील फार्मसी महाविद्यालयांमध्ये नशा मुक्ती अभियान कार्यक्रम



**खराडी : प्रतिनिधी**

खराडी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स आणि रिसर्च सेंटर या महाविद्यालयांमध्ये खराडी पोलीस स्टेशन, पुणे यांच्या सहकार्याने नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत अमली पदार्थ सेवन प्रतिबंध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले, खराडी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री. संतोष म्हेत्रे व दिलावर सय्यद सर तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना जीवन हे अनमोल असून व्यसनामुळे फक्त विद्यार्थ्यांचे स्वास्थ्यच नव्हे तर त्याचा परिणाम परिवार, समाज, आणि देशावरही होतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहावे तसेच विद्यार्थ्यांनी घेतलेल्या नशा मुक्त अभियान च्या शपथचे पालनही करावे असे संबोधित केले.

खराडी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री. संतोष म्हेत्रे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यसनांचे विविध प्रकार, महाविद्यालयीन जीवनामध्ये विविध प्रकारचे व्यसनाला मुले कशी आहारी जातात व व्यसनांच्या विविध प्रकरणांपासून दूर कसे राहावे याबद्दल उदाहरणासह समजावून सांगितले. त्याचबरोबर सर्वांनी जागरूक राहणे आवश्यक असून आपल्या अवतीभवती अशा प्रकारच्या काही समाजविघातक प्रवृत्ती आढळल्यास त्याची माहिती जवळच्या प्रशासनास कळवावी असे आवाहन त्यांनी केले.

सदरच्या कार्यक्रमांमध्ये प्रथमतः उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना महाविद्यालयातील प्राध्यापक व कार्यक्रमाचे समन्वयक श्री. नितीन नेहरकर यांनी नशा मुक्त भारत अभियानाची शपथ दिली. सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी मार्गदर्शन केले.

सदरच्या कार्यक्रमाचे नियोजन प्राध्यापिका बिलवडा बाईचे यांनी तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका व सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. तृप्ती शहा यांनी केले.

# सरकारी पक्षाचेच आरोप अस्पष्ट; कल्याणीनगर प्रकरणात बचाव पक्षाचा युक्तिवाद



**पुणे : प्रतिनिधी**

आई शिवानी, ससूनमधील वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. श्रीहरी हाळनोर, डॉ. अजय तावरे यांच्यासह दहा आरोपींविरुद्ध आरोप निश्चितीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सरकार पक्षाकडून विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी खटल्याची सखोल माहिती न्यायालयासमोर मांडली होती.

त्यानंतर आरोपींच्या वकिलांकडून युक्तिवाद सुरू करण्यात आला. अल्पवयीन

# हडपसर रेल्वे स्थानव

# पलूसकर यांच्या



https://pdeasubpharm.s3.us-east-2.amazonaws.com/News/20/WhatsApp Image 2025-12-15 at 3.22.54 PM.jpeg 1/1